नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/०६/२०२५ (रविवार)**

---

## कत्तलीसाठी खोलीमध्ये कोंडुन ठेवलेल्या १२ गोवंश जनावारांची सुटका
## सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०८/०६/२०२५ रोजी सावनेर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कसाईपुरा, सावनेर येथे एका खोलीमध्ये कत्तली साठी अवैधरित्या गोवंश जनवरांना कोंडुन ठेवले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता. गुप्त बातमीदारांने दाखविलेल्या खोलीला कुलुप होते. पोलीसांनी घरमालक नामे शकिल इसाक कुरेशी, वय ५९ वर्षे,रा आंबेडकर वार्ड, सावनेर याचा शोध घेवुन खोलीत पाहणी केली असता १२ गोवंश जनावरे निर्दयते कोंबुन ,चारा पाण्याची सोय न करता खोलीत कोंडुन ठेवले असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी आरोपी आरोपी कं १) नामे शकिल इसाक कुरेशी याला जनावरे खरेदी विक्री पावती बाबत विचारपुस केली त्याचे कडे पावती नव्हती तसेच अधिक विचारपुस केली असता सदर गुन्हयात आरोपी कं २) आरिफ शकील कुरेशी , वय ३८ वर्षे, आणि आरोपी कं ३) अलताफ शकिल कुरेशी ,वय ३१ वर्षे, रा आंबेडकर वार्ड, सावनेर यांचा सहभाग असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी १२ गोवंश जनावरांची सुटका करून गोशाळा, कोवठा जि नागपुर येथे पाठविण्यात आले आहे.

नमुद प्रकरणी आरोपी कं १) शकिल इसाक कुरेशी, वय ५९ वर्षे, आरोपी क २) आरिफ शकील कुरेशी , वय ३८ वर्षे, आणि आरोपी क ३) अलताफ शकिल कुरेशी ,वय ३१ वर्षे, रा आंबेडकर वार्ड, सावनेर यांच्या विरूध्द कलम प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम आणि महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# घरफोडीचा उघड ,४ लाख ९७ हजारांचा मुद्देमाल जप्त

# खापरखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अपराध क्र. ४१७/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ) भान्यासं असा घरफोडीचा गुन्हे नोंद आहे.

नमुद दाखल गुन्हयांचा तपास खापरखेडा पोलीस करीत असतांना दिनांक ०८/०६/२०२५ रोजी पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी क्रमांक **१. गौरव राजेंद्र राठोड, वय २१ वर्षे, रा म्हाडा कॉलनी कपीलनगर, नागपुर आणि विधीसंघर्ष ग्रस्त यांना नागपुर येथुन** ताब्यात घेवुन गुन्हयासंदर्भात सखोल विचारपुस केली असता दोघांनी मिळुन अप क्र. ४१७/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ) हा गुन्हा केल्याची महीती पोलीसांना प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीकडुन चोरीस गेलेला सोन्याचा ऐवज किंमती ४,९७,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी क्रं १ याला अटक केली असुन दिनांक १०/०६/२०२५ रोजी पर्यंत**

**उघडकीस आलेले गुन्हे—**

१) पोस्टे खापरखेडा अप क्र. ४१७/२०२५ कलम ३३१(४),३०५ (अ)




# चोरीचे २ गुन्हे उघड ,स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अपराध क्र. ६२९/२०२४ कलम ३०३ (२) भान्यासं आणि ४५१/२०२५ कलम ३०३ (२) भान्यासं, असे दोन चोरीचे गुन्हे नोंद आहे.

नमुद दाखल चोरीच्या गुन्हयांचा तपास कळमेश्वर पोलीस करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांचे पथक सुध्दा समांतर तपास करीत होते. दिनांक ०८/०६/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे आरोपी क्रमांक **१. कुदंन गौतम हिरे, वय २५ वर्षे, रा धरमनगर पिपरी, कन्हान याला कन्हान येथुन ताब्यात घेतले , आरोपी क्रमांक २. शुभम बलराम हरीणखेडे ,वय २४ वर्षे, कुपरवाही, ता. कळमेश्वर, याला कटंगी, जि. बालाघाट राज्य मध्यप्रदेश येथुन** ताब्यात घेवुन गुन्हयासंदर्भात सखोल विचारपुस केली असता आरोपी क्रं १ आणि २ यांनी मिळुन अप क्रं ४५१/२०२५ कलम ३०३ (२) भान्यासं हा गुन्हा केला तसेच आरोपी क्र १ याने एकटयानेच अप क्रं ६२९/२०२४ कलम ३०३ (२) भान्यासं हा गुन्हा केल्याची महीती पोलीसांना प्राप्त झाली.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीकडुन चोरीस गेलेले १). एक अक्वा कंपनी चा मोटरपंप किंमती १०,०००/— रूपये , २). ५० फुट केबल किंमती ५,०००/— रूपये , ३). लोखंड पाईप आणि तुटलेली सायकल किंमती २०००/— रूपये, ४).ताब्याची तार किंमती ४०००/— रूपये असा मुद्देमाल असा एकूण २१,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. **नमुद आरोपीतांना पुढील तपासकामी पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे—**

१) पोस्टे कळमेश्वर अप क्र ६२९/२४कलम ३०३ (२),भान्यासं

१) पोस्टे कळमेश्वर अप क्र ४५१/२५ कलम ३०३ (२) भान्यासं

## पोलीस स्टेशन सावनेर हददीमध्ये हरविलेले/गहाळ झालेले २० मोबाईल त्यांचे मुळ मालकांना परत देण्यात आले

नागपुर ग्रामीण जिल्या अंतर्गत पोलीस स्टेशन सावनेर हददीमध्ये सन २०२४ ते २०२५ गहाळ झालेले विवो, रेअल मी, सॅमसंग, ओपो, रेडमी, टेकनो, कंपनीचे २० मोबाईलचा तांत्रीक पदधतीने शोध घेवून दिनांक ०८/०६/२०५ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथे त्याचे मुळ मालक नामे— १) शौर्य विलास मेश्राम ईसापुर ता. सावनेर २) सुरेशचद्र रमेशचद्र तिवारी रा. सावनेर ३) निलेश रेवाराम कोढांले रा. सावनेर ४) चेतन गंगाधरराव देशपांडे रा. सावनेर ५) मोहनलाल हरीप्रसाद खवसे रा. बोरगाव सौसर छिदंवाडा (म.प्र.) ६) सौ वैशाली शिवाजी विरडकर रा. सावनेर ७) धानश्री मनोज चिन्नोरकर रा. भौयाजी सावंगी ८) अमोल केवलजी घाटोळे रा. परसोडी वकील ९) प्रविन रामरावजी बोबडे रा. सावनेर १०) गणेश सुखलाल आढे रा. सावनेर ११) भावीक अनिल घ्यार रा. पाटनसावंगी सावनेर १२) सतिष गुलाब नानवटकर रा. हेटी सुरला सावनेर १३) हर्षल राजेद्र डाघोडे रा. सावनेर १४) दिलीप रजनलाल मदने रा. पाटनसावंगी सावनेर १५) तनुश्री दिलीपराव बेरड रा. सावनेर १६) चंदु मधुकर धांदे रा. सावनेर १७) वैभव सुरेश रूषीया रा. सावनेर १८) सौ संध्या चितांमन अढाउ रा. सावनेर १९) सौ मंगला राजु खौरकर रा. सावनेर २०) विलास पुरूषोत्तम भगत रा. खापा सावनेर यांना श्री. अनिल म्हस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर. पोलिस निरीक्षक श्री उमेश पाटील यांच्या हस्ते देण्यात आलेले आहे.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १ आरोपी अटक ,भिवापुर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक ०७/०६/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा तास ,जवळील हॉटेल वाडा ,भिवापुर येथे नाकाबंदी केली असता, नाकाबंदी दरम्यान ट्रक क्र.एम एच ४० सि.एन. ७११६ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **मोहन हरिसिंग वलके, वय ३७ वर्ष, रा. जुना बगडगंज, जि.नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता वाहन मालक नामे **कैलाश मनोहर सपाटे रा. वघाडा बर्डी ता. आरमोरी जि. गडचिरोली** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी

पंचासमक्ष १) ट्रक क्र.एम एच ४० सि.एन ७९१६ किंमती ३०,००,०००/— रूपये व २) ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये आणि असा एकुण ३०,४०,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**नमुद प्रकरणी चालक आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद जिल्हा वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक ०७/०६/२०२५ रोजी जिल्हा वाहतुक शाखेचे पथक हे पोलीस स्टेशन कुही हद्दीत मौजा चांपा टाउन भाग उमरेड ते नागपुर या रोडवर नाकाबंदी करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी दरम्यान १० चक्का टिप्पर क्र एम. एच. ४९. १२९९ या वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **आकाश संतोष अरतपायरे वय २८ वर्षे ,रा. उटी, ता. उमरेड जि. नागपुर** याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता **वाहन मालक नामे मिलींद दिलीप तेलंग, रा नंदनवन, नागपुर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) १० चक्का टिप्पर क्र एम एच. ४९ १२९९ किंमती २५,००,०००/— रूपये व २) ०६ ब्रास रेती किंमती ३६,०००/— रूपये आणि असा **एकुण २५,३६,०००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह

कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०७/०६/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, खंडाळा घटाटे येथे एक इसम नामे अजय दिलीप पानतावने रा. खंडाळा घटाटे हा अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतूक करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खंडाळा घटाटे ते कन्हान येथे पेट्रोलींग केली असता, नाकाबंदी दरम्यान मिनी टॅक्टर — टाटा कंपनीचा छोटा हाती एम एच ४० बि.जी ९११३ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक आरोपी नामे अजय दिलीप पानतावने वय ३८ वर्ष रा. खंडाळा घटाटे याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता नमुद वाहन त्याचेच मालकीचे असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष १) टाटा कंपनीचा छोटा हाती एम एच ४० बि.जी ९११३ किंमती ३,००,०००/— रूपये व २) १ ब्रास रेती किंमती २५,००/— रूपये आणि असा एकुण ३,०२,५००/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी वाहन चालक /मालक आरोपी विरूध्द कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**